**कृपया प्रसिद्धीसाठी** **18 डिसेंबर 2012**

## तारापूर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी काय केले?

### *उच्च न्यायालयाने सरकार आणि अणुशक्ती महामंडळाकडून स्पष्टीकरण मागितले.*

**मुंबई, मंगळवार:** तारापूर अणुऊर्जा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना महाराष्ट्र सरकारने कोणती कामे केली आणि त्यासाठी भारतीय अणुशक्ती महामंडळाने (एनपीसीआयएल) किती निधी दिला याची तपशीलवार माहिती देण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अजय खानविलकर आणि न्यायमूर्ती रमेश धानुका यांच्या खंडपीठाने सोमवारी दिला. प्रकल्पग्रस्तांच्यावतीने ॲड. राजीव पाटील आणि रिट याचिकेत हस्तक्षेप केलेले माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी बाजू मांडली तर महाराष्ट्र सरकारच्यावतीने ॲड. नितीन देशपांडे आणि अणुशक्ती महामंडळाच्यावतीने ॲड. राजेश कोठारी हे हजर होते.

तारापूर अणुऊर्जा प्रकल्प 1,080 मेगावॅट अणुऊर्जा निर्माण करीत आहे. तथापि रिट याचिका दाखल होऊन आठ वर्षे पूर्ण झाली तरीही पुनर्वसनाची कामे पूर्ण झाली नाहीत अशी तक्रार प्रकल्पग्रस्तांच्यावतीने करण्यात आली होती. दि. 26 नोव्हेंबर रोजी झालेल्या सुनावणीमध्ये कोणती कामे अद्याप पूर्ण व्हावयाची आहेत याची तपशीलवार माहिती दि. 7 डिसेंबर रोजी सादर करण्याचे आदेश खंडपीठाने दिले होते. त्यानुसार पुढील अकरा बाबी अद्याप पूर्ण झाल्या नसल्याचे निवेदन उच्च न्यायालयात सादर करण्यात आले होते.: 1)सदोष घरांच्या दुरुस्तीसाठी अणुऊर्जा महामंडळाने जिल्हाधिका-यांना रु. 11 कोटी 49 लाख देणे, तसेच पोफरण येथील 32 घरे पावसाळ्यात पाण्याखाली जातात, त्याऐवजी नवी घरे देणे. 2) वसाहतीतील रस्त्यांचे सपाटीकरण, देखभाल तसेच पक्के रस्ते बांधण्यासाठी रु. 3 कोटी 39 लाख देणे. 3) प्रत्येक भूमिहीन कुटुंबाला रु.30,000 सानुग्रह अनुदान देणे. 4)एकूण 289 शेतकरी आहेत,

त्यापैकी 112 शेतक-यांना जमिनीच्या बदल्यात जमीन देणे. 5) प्रकल्पपीडित कुटुंबांना दरमहा रु. 2,500 भाड्यापोटी द्यायचे ठरले होते. परंतु काही कुटुंबांना अद्यापही रक्कम देण्यात आलेली नाही. 6) सर्व 1,250 कुटुंबांना पिण्याच्या पाण्याची सोय तसेच पाणी पुरेशा दाबाने देणे. 7) नव्या अक्करपट्टी व पोफरणच्या गावांच्या सीमा आखून देणे तसेच 98 हेक्टर जमिनीवरील अतिक्रमण हटविणे. ग्राम पंचायतींची स्थापना करुन पुनर्वसित वसाहती त्या-त्या ग्रामपंचायतीकडे सोपविणे. 8) प्रकल्पपीडितांना त्यांची गा-हाणी 'तक्रार निवारण समिती' समोर मांडता आली पाहिजेत, तसेच तक्रार निवारण समितीच्या निर्णयांची राज्य सरकारने अंमलबजावणी करणे. तक्रार निवारण समितीचे काम तातडीने सुरु करण्यासाठी समितीच्या अध्यक्षांचे गेले दीड वर्षे रिक्त असलेले पद तातडीने भरणे. 9) 438 मच्छिमार कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला एक हेक्टर शेतजमीन देणे. 10) प्रत्येक प्रकल्पपीडित कुटुंबातील एका व्यक्तीला कायमस्वरुपी नोकरी देणे. 11)राष्ट्रीय पुनर्वसन योजना 2003 व सुधारित पुनर्वसन योजना 2007 चे अतिरिक्त लाभ प्रकल्पपीडितांना देणे.

वरील अकरा बाबींच्या संदर्भात नेमकी स्थिती काय आहे याबाबत राज्यसरकारच्या तसेच महामंडळाच्या निर्णय घेऊ शकणा-या सक्षम अधिका-यांनी एकत्र बसून चर्चा करावी आणि त्यानंतर वस्तुस्थितीची माहिती देणारी प्रतिज्ञापत्रे सादर करावीत असे आदेश खंडपीठाने दिले. पुढील सुनावणी 10 जानेवारी 2013 रोजी होणार आहे.

**(कार्यालय सचिव)**